# यंत्रमानव

परदेशात तयार झालेत
यंत्रमानव उर्फ रोबो
पराक्रमच हा आधुनिक तंत्रज्ञानाचा.

तो करतो नाजूक, सूक्ष्म हालचाली
ऑर्डर दिल्याबरहुकूम
महाग असतात म्हणे ते प्रचंड
बनवायला खर्चच येतो केवढातरी

पण का करतात ते असं?
म्हणजे एवढं करायची गरजच काय?
आमच्याकडे तयार होतात
घराघरात बिनबोभाट
घराघरात प्रेमाने मारून टाकली जाते
पोरांची स्वतंत्रबुध्दी
उरलेलं काम करतात शाळा, कॉलेजे
इथं दिली जातात पुस्तकं घोकायला
पहिला नंबर, जो सर्वात घोकंपट्टीबाज,
त्याचे पेपरात फोटो, मुलाखती
निवडले जाते त्यांना उच्चशिक्षणासाठी
मग तिथं ते होतात, पूर्ण रोबो.

त्यातले सुपररोबो जातात
मॅनेजमेंट साइडला
तिथे खात्री केली जाते
रोबोला कुठाल्याच विषयावर
कसलीच मते नाहीत याची
त्याला माहीत नसलेच पाहिजे
भोवतीच्या समाजाचे वास्तव
नोकरी देण्याआधी नीट पाहून घेतात
रोबोच्या आत राहून तर गेला नाहीना
संवेदनाशील मनाचा अंश
किंवा निर्मितीशील वृत्तीचे खरकटे

मग त्यांना चढवतात, सूट बूट टाय
शिवाय चेहऱ्यावर कायम निष्कारण स्मित
भरतात त्यांच्यात लठ्ठ पगाराचं इंधन
की बोलू लागतात ते पोपटासारखी
वरिष्ठांची भाषा.

नंतर एकदाच प्रत्यय येतो
रोबोत मन नावाची भानगड
शिल्लक असल्याचा
करतात आक्रोश,
जेव्हा त्यांना कंपन्या काढातात
मोडीत.
होतात निराश, पण बोलणार कुठं?
नसतात जोडलेली कोणी जवळची जिव्हाळ्याची माणसं

त्यावेळी होतं दुःख
पण तो पर्यंत
रोबोचं झालेलं असतं भंगार
रुपया किलोचा ही भाव नसलेलं.

– अनिल अवचट